MAHARASHTRA STATE INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT AND CATERING TECHNOLOGY AND RESEARCH SOCIETY, PUNE

**MAHARASHTRA STATE INSTITUTE OF HOTEL MANAGEMENT AND CATERING TECHNOLOGY - NAAC Accredited**

Affiliated to Savitribai Phule Pune University & Recognized by AICTE, New Delhi

412-A, K. M. Munshi Marg, Bahirat Patil Chowk, Shivajinagar, Pune – 16.

☎- 25676640 Email: msihmctrsoffice@gmail.com, website: msihmctrs.in

Ref. MSIHMCTRS/UG-PG/ 2026/185 Date: 21.02.2026

To,

_________________________

_________________________

_________________________

**Sub:-** Extension of last date for submitting quotation for Dispose-off process.

**Ref:-** Our letter No MSIHMCTRS/UG-PG/2026/140 dated 12.02.2026.

Sir / Madam,

We had initiated quotation invite process for Dispose-off process on 12.02.2026 and given 08 days to submit quotation. Please note that the last date for submission of the quotation and the documents has been extended till 02.03.2026.

Principal

PRINCIPAL
(UG-PG)
Maharashtra State Institute of Hotel Management & Catering Technology
Shivajinagar, Pune - 411 016

महाराष्ट्र राज्य् इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी अँड रीसर्च सोसायटी, पुणे
**महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे**
**नॅक मान्यता प्राप्त**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत व ए.आय.सी. टी. ई. मान्यताप्राप्त
४१२/सी.के.एम.मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे – ४११०१६
☎- 25676640 Email: msihmctrsoffice@gmail.com , web site: msihmctrs.in

जा.क्र. मराआयएचएमसीटीरिसो/पदवी-पदव्युत्तर पदवी/२०२६/१४० दिनांक- १२.०२.२०२६

## निर्लेखन साहित्याची विक्री सूचना

या कार्यालयातील जुन्या कालबाहय निरुपयोगी निर्लेखित साहित्याची विक्री 'जिथे आहे जसे आहे' स्थितीत खालील अटी व शर्तीनुसार करण्यात येत आहे. त्याकरिता अनुभवी व इच्छुक खरेदीदारांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. या संदर्भातील अधिक माहिती या कार्यालयाच्या सूचना फलकावर / भांडार विभागात कार्यालयीन वेळेत मिळू शकेल.

अटी व शर्ती

१) लिलावात भाग घेणा-याने दोन पाकिटे देणे आवश्यंक आहे. दोन्ही पाकिटांच्या मागे आपला पत्ता लिहावा.

 १.१ एका पाकिटात आपले पॅनकार्ड, व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र यांची छायाप्रत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा / दरपत्रक स्वीकारले जाणार नाही.

 १.२ दुस-या पाकिटावर प्रपत्र – अ भरुन त्यावर विक्री प्रक्रियेचे दरपत्रक (भांडी, संगणक व इतर) असा उल्लेख करावा. त्याखाली 'Principal, Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology (UG-PG – Degree Programme), 412-A, K. M. Munshi Marg, Bahirat Patil chowk, Shivajinagar, Pune – 411 016, Phone No. – 25676640, Email: msihmctrsoffice@gmail.com, Website: msihmctrs.in' व 'Principal, Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology (UG-PG – Degree Programme), 412-A, K. M. Munshi Marg, Bahirat Patil chowk, Shivajinagar, Pune यांच्या नावाचा अनामत रक्कम म्हणून रु. १०००/- चा डिमांड ड्राफट असणे आवश्यक आहे. अन्य्था निविदा / दरपत्रक रदद समजण्यात येईल.

२) सदरचे साहित्य् इच्छुक लिलावात भाग घेणा-यांना १२ फेब्रुवारी २०२६ ते २० फेब्रुवारी २०२६ (अंतिम दिनांक) या कालावधीत दुपारी २.०० ते ३.०० या वेळेतच पाहता येतील.

३) निविदा / दरपत्रके अंतिम दिनांकापर्यत दुपारी ३.३० वाजेपर्यत वरील अटी / शर्तीनुसार सीलबंद लखोटयात स्वीकारली जातील. त्यानंतरची निविदा / दरपत्रके स्वीकारली जाणार नाही अथवा कोणत्याही प्रकरचा टपाल विलंब गाहय धरला जाणार नाही याची लिलावात भाग घेणा-यांनी कृपया नोंद घ्यावी.

४) प्रत्यक्ष साहित्य् जागेवर आहे त्यास्थितीत पाहिल्यानंतरच आपले दर प्रपत्र – अ मध्ये देण्यात यावे नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

५) सोबत दिलेल्या प्रपत्र – अ मध्ये सदर साहित्याची शासकीय नियमानुसार अपेक्षित किंमत दिली आहे. या किमती पेक्षा तुलनेने सर्वात जास्त् किंमत देणा-यास सदर साहित्य् विकले जाईल याची नोंद घ्यावी.

६) निविदा दरपत्रक उघडण्याच्या वेळी केवळ निविदा भरलेल्यानाच उपस्थित राहता येईल. त्याकरीता लिलावात भाग घेणार्याचे केवळ एक प्रतिनिधी उपस्थित राहू शकतील. प्रतिनिधीला ओळखीचा पुरावा देणे आवश्यक आहे.

७) ज्याचे निविदा / दरपत्रक मंजुर झाले आहे, त्यांनी सदर साहित्य् स्वखर्चाने आहे त्या स्थितीतील व ठिकाणावरुन संस्थेच्या मालमत्तचे कोणतेही नुकसान न करता आदेश मिळाल्यापासुन तीन दिवसाच्या आत घेऊन जाणे. सदर साहित्य् नेताना संस्थेच्या मालमत्तेचे कोणतेही नुकसान झाल्यास भरपाई करुन द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.

८) यशस्वी बोलीधारकास साहित्याची पुर्ण रक्क्म डिमांड ड्राफट द्वारे भरल्यानंतरच माल ताब्यात दिला जाईल. रोखीने / धनादेशाद्वारे रक्क्म स्वीकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

९) खरेदी केलेले साहित्य् पुर्ण रक्क्म अदा केल्यानंतर विहित मुदतीत ताब्यान न घेतल्यास अनामत रक्क्म संस्थेच्या खात्यात जमा करण्यात येईल व त्यानंतर सदर साहित्यावर आपला हक्क् राहणार नाही.

१०) खरेदी केलेले साहित्य् संस्थेबाहेर नेताना पहारेक-यास गेटपास दाखवणे आवश्यक आहे.

११) खरेदी केलेले साहित्यावर कोणत्याही प्रकारचा कर अथवा खर्च लागल्यास तो आपण स्व्तः भरावयाचा आहे. संस्था यातील कोणतीच रक्क्म देणार नाही.

१२) निविदा / दरपत्रक मंजुर झाल्यानंतर सदर साहित्य् विहित मुदतीत ताब्यात घेण्याची जबाबदारी आपली आहे. संस्थेच्या आवारात पडलेले आपण खरेदी केलेल्या साहित्याची जबाबदारी संस्थेची राहणार नाही.

१३) काही तांत्रिक कारणास्त्व साहित्य् विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतिम निर्णय या कार्यालयाचा राहील.

१४) कोणतेही कारण न देता निविदा / दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा किंवा संपूर्ण खरेदीप्रकिया रदद करण्याचा किंवा त्यात फेरबदल करण्याचा हक्क् निम्न् स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवलेला आहे. तसेच आपणाकडून अटी व शर्तीचा भंग झाल्यास आपल्याला दिलेला विक्री आदेश रदद करण्याचा अधिकार राखून ठेवण्यात आलेला आहे.

१५) विक्रीच्या तारखेत बदल झाल्यास त्याबाबत आपल्याला कळविण्यात येईल.

प्राचार्य
प्राचार्य
(पदवी व पदव्युत्तर पदवी)
महाराष्ट्र राज्य इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी,
शिवाजीनगर, पुणे - 411 016

महाराष्ट्र राज्य् इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी अँड रीसर्च सोसायटी, पुणे

**महाराष्ट्र राज्य इन्स्टिटयुट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरींग टेक्नॉलॉजी, पुणे**

**नॅक मान्यता प्राप्त**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत व ए.आय.सी. टी. ई. मान्यताप्राप्त

४१२/सी.के.एम.मुन्शी मार्ग, शिवाजीनगर, पुणे – ४११०१६

☎- 25676640 Email: msihmctrsoffice@gmail.com, website: msihmctrs.in

## प्रपत्र -अ

निविदा / दरपत्रक

दिनांक -

मी स्वत: / माझ्या प्रतिनिधीने आपल्या संस्थेत येऊन विक्री करावयाच्या साहित्याची पाहणी केली आहे. या साहित्याची शासकीय किंमत मला माहित असुन या सर्व प्रकियेकरिता लागु असलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य् आहेत. सदर साहित्य् खरेदीकरीता मी मला योग्य् वाटत असलेली रक्कम खालीलप्रमाणे भरुन देत आहे.

| अनु. क्रं. | साहित्याचा तपशील | शासकीय किंमत | खरेदीदाराची किंमत |
|---|---|---|---|
| १) | भांडी | ८,१४१/- | |
| २) | संगणक व इलेक्ट्रॅनिक | ४,७००/- | |

स्वाक्षरी

( )

एजन्सीचे नाव व शिक्का

टिप : आपण देत असलेली रक्कम तुलनेत इतरांपेक्षा जास्त् असल्यास आपल्याला साहि त्य् विक्री आदेश देण्यात येतील व त्याची सर्व रक्कम आपणाला डिमांड ड्राफ्टने "Principal, Maharashtra State Institute of Hotel Management and Catering Technology, Pune" या नावाने भरावी लागेल व विहित कालावधीत साहित्य् ताब्यात घ्यावे लागेल. असे न झाल्यास आपली रक्कम संस्थेच्या खात्यात जमा होईल व सदर साहित्यावर आपला हक्क् राहणार नाही, याची नोंद घ्यावी.